**फौ. कि. अर्ज क्र. ९०/२०२१**
सौ. संगिता वि. दशरथ पारेकर
निशाणी क्र.– २७ च्या पुढे

**अर्जदार तर्फे साक्षीदार क्र.२ यांची जबानी**

मी शपथेवर सांगते की,

माझे नांव– ज्ञानदेव नामदेव हुबाले
वय– ६५ वर्षे, धंदा – शेती,
रा. पिठेवाडी, ता. इंदापूर, जि. पुणे.

**सरतपासणी अर्जदारातर्फे विधीज्ञ श्री. बी.पी.जगताप यांच्या मार्फत**

१. माझ्या पुराव्याचे शपथपत्र **निशाणी क्र.२७** मधील सर्व मजकुर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहण्यात आलेला असून तो खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. ती सही मी ओळखतो.

***सरतपास पुर्ण.***

**साक्षीदाराचा उलतपास जाबदेणार तर्फे विधीज्ञ श्री. के. व्ही. मारकड यांच्या मार्फत**

२. माझे शिक्षण काही झालेले नाही. मला फक्त सही करता येते. मला दोन मुली व दोन मुले आहेत. अर्जदार ही माझी मुलगी आहे. हे म्हणणे खरे आहे की, जाबदेणार हे माझ्याच गावातील आहेत. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार व जाबदेणार यांचे लग्न जाबदेणार यांचे घरासमोर झाले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे लग्नाचा संपुर्ण खर्च जाबदेणार यांनी केला होता. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदाराला एक मुलगा व एक मुलगी असुन दोघेही सज्ञान आहेत. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार सन २०१५ पासुन माझ्याकडे राहात आहे. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१५ पर्यंत अर्जदार व जाबदेणार यांच्यात कोणतीही तक्रार होत नव्हती.

३. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार ही शेळ्या चारण्यासाठी जाते. हे म्हणणे खरे

नाही की, बळीराम तुकाराम रसाळ हा आमच्या गावातील व्यक्ती आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि.२५/०६/२०१६ रोजी जाबदेणार याने अर्जदाराला बळीराम तुकाराम रसाळ सोबत अनैतिक संबंध करताना पाहिले होते. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार व जाबदेणार यांचे भांडण झाले व तेव्हापासुन ती माझ्याकडे राहण्यास आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि.१२/०७/२०१६ रोजी मी, माझी पत्नी व मुले यांनी मिळुन जाबदेणार याचे घरी जावुन त्याला मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी जाबदेणार याने बावडा पोलीस स्टेशन येथे माझ्याविरुध्द फिर्याद दाखल केली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी जाबदेणार याचेकडे कपडे–लत्ते व दागदागिने परत मागितले होते व ते दिले नाहीत तर बळीराम रसाळ मार्फत त्याचे विरोधात खोटी तक्रार दाखल करेन.

४. हे म्हणणे खरे नाही की, जाबदेणार याचे आई–वडील वयस्कर आहेत व जाबदेणार याचे वडीलांना डोळ्याला दिसत नाही. हे म्हणणे खरे नाही की, जाबदेणा–यावर त्याचे आई–वडील व मुलांचे शिक्षणाची जबाबदारी आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझी मुलगी तिचे सासरी नांदत असताना मी कधीही तिच्या सासरी राहण्यासाठी गेलो नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला जाबदेणार याचे दैनंदीन कामाबाबत काही माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला जाबदेणार याचे उत्पन्नाबाबत काहीही माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मुलीस जाबदेणार याने मारहाण करताना मी कधीही पाहिले नाही.

५. हे म्हणणे खरे आहे की, आजरोजी साक्ष देणेकामी माझ्या मुलीने मला सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मुलीच्या सांगण्याप्रमाणे आजरोजी न्यायालयात साक्ष देण्यास आलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पुराव्याचे शपथपत्रातील संपुर्ण मजकुर माझ्या मुलीचे सांगणेप्रमाणे तयार केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मुलीच्या लग्नात दिलेल्या संसार उपयोग वस्तु व रु.५०,०००/– दक्षिणा व तसेच सोन्याचे दाग–दागिनेबाबत माझ्याकडे कोणतेही दस्त नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, सदर लग्नात चार ते पाच लाख रुपये खर्च केलेबाबत माझ्याकडे कोणतेही दस्त नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, माझी मुलगी स्वतःचा सांभाळ करण्यास सक्षम आहे. हे म्हणणे खरे

नाही की, माझ्या सरतपासातील संपुर्ण मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

| | | |
|---|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत<br>Digitally signed by MUJAHEDUL HAQUE HAFEEZUL HAQUE FAROOQUI Date: 2026.07.14 18:08:00 +0530<br>न्यायदंडाधीकारी प्र.श्रे.इंदापूर<br>दिनांक – १४/०७/२०२६ | | समक्ष,<br>Digitally signed by MUJAHEDUL HAQUE HAFEEZUL HAQUE FAROOQUI Date: 2026.07.14 18:07:56 +0530<br>(एम.एच. फारुकी)<br>न्यायदंडाधीकारी प्र.श्रे.इंदापूर |